मुंबई रेल्वे विकास महामंडळास मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-IIA करिता जागतिक बँकेकडून प्राप्त झालेली अर्थसहाय्याची रक्कम पुस्तकी समायोजित करण्याबाबत (सन २०१८-१९)

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमयुटीपी-३३१९/प्र.क्र.२२/२/नवि-७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३० मार्च, २०१९

पहा :-

१. नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एमयुटीपी-३३१५/प्र.क्र.५९/(१)/नवि-७ दिनांक ३१ मार्च, २०१६
२. नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एमयुटीपी-३३१६/प्र.क्र.११३/(१)/नवि-७ दिनांक ३१ मार्च, २०१७
३. नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एमयुटीपी-३३१७/प्र.क्र.११७/नवि-७ दिनांक ३१ मार्च, २०१८
४. वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अर्थसं.२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८
५. नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक बीयुडी-.२०१८/प्र.क्र.५५/नवि-४, दिनांक ०३ एप्रिल, २०१८
६. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक पुरक-२०१८/प्र.क्र.९५/अर्थ-३, दिनांक २७ जुलै, २०१८
७. नगर विकास विभाग शासन परिपत्रक क्र. पुरक-२०१८/प्र.क्र.१३८/नवि-४, दिनांक १८ ऑगस्ट, २०१८
८. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे पत्र क्रमांक एमयुटीपी/जेपीडी(एफआयएन)/ एसीए/ ए-०२/२०१८-१९, दिनांक ०५.१२.२०१८.
९. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९.
१०. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दिनांक ०८ मार्च,२०१९.

प्रस्तावना :

मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक व परिवहनामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकार व महाराष्ट्र शासन यांनी संयुक्तपणे मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-II हाती घेतला आहे. या प्रकल्पामध्ये रेल्वे प्रकल्प तसेच या प्रकल्पामुळे बाधित होणा-या व्यक्तीचे पुनर्वसन इत्यादी कामांचा समावेश आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून प्रकल्पाचा एकूण खर्च रु.५,३०० कोटी इतका आहे. या प्रकल्पातील मुंबई नागरी परिवहन प्रकल्प- IIA अंतर्गतची कामे जागतिक बॅकेच्या वित्तीय सहाय्यातून हाती घेतली आहेत. सदर प्रकल्पाकरिता जागतिक बॅकेने रु.१,९१० कोटी इतके कर्ज मंजूर केले आहे.

सदर प्रकल्पावर प्रकल्प अंमलबजावणी संस्था मुंबई रेल्वे विकास महामंडळ प्रथम खर्च करते, झालेल्या खर्चाच्या ५०% खर्च महाराष्ट्र शासनाच्यावतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून मुंबई रेल्वे विकास महामंडळास अदा करण्यात येतो. मुंबई रेल्वे विकास महामंडळ केलेल्या खर्चाचे प्रतिपूर्ती

दावे जागतिक बँकेस खर्च केल्यानंतर सादर करते. जागतिक बँकेने सदर प्रतिपूर्ती दावे मंजूर केल्यानंतर तेवढीच रक्कम जागतिक बँकेकडून केंद्र शासनास वितरीत केली जाते. त्यामधील राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम राज्य शासनाच्या निलंबन शीर्षाखालील खर्चाचे पुस्तकी समायोजनासाठी नियमित लेखाशिर्षाखालील तरतूद वितरित केली जाते व राज्य शासनाच्या वतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई रेल्वे विकास महामंडळास उपलब्ध केलेली रोख रक्कम महाराष्ट्र शासनाकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास वितरीत केली जाते.

केंद्र शासनाने आतापर्यंत रु. ८६४,५३,२५,५००/- एवढे कर्ज सहाय्य राज्य शासनास वितरीत केले असून आता पर्यत राज्य शासनाने रु. ५७५,२६,७८,५००/- एवढी रक्कम वितरीत केलेली आहे. केंद्र शासनाने राज्य शासनास वितरित केलेल्या रक्कमेमध्ये समाविष्ट असलेल्या मुंबई रेल्वे विकास महामंडळास परस्पर वितरित केलेल्या राज्य हिश्याच्या रु. १५६,२०,७७,०००/- (अक्षरी एकशे छपन्न कोटी वीस लाख सत्त्याहतर हजार फक्त) इतक्या रक्कमेचे केवळ पुस्तकी समायोजन करावयाचे असल्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये शासनास कळविले आहे. यापार्श्वभूमीवर सन २०१८-१९ च्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीच्या मर्यादेत रु.१५६,२०,७७,००० /- (अक्षरी एकशे छपन्न कोटी वीस लाख सत्याहत्तर हजार फक्त) इतकी रक्कमेचे पुस्तकी समायोजन करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती. यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय -</u>

०१. मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुटीपी-IIA LOAN NO.IBRD ७९४१-IN) यासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेली अतिरिक्त केंद्र सहाय्यामधील कर्ज सहाय्याच्या रक्कमेपोटी सन २०१८-१९ या चालू वित्तिय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदीमधून रु.१५६,२०,७७,०००/- (अक्षरी एकशे छपन्न कोटी वीस लाख सत्याहत्तर हजार फक्त) इतक्या रक्कमेचे पुस्तकी समायोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०२. उपरोक्त रक्कम "मुख्य लेखाशिर्ष-२२१७-मागणी क्रमांक एफ-२, ८०, सर्वसाधारण, १९१ महानगरपालिकांना सहाय्य, केंद्र सहाय्यीत योजना मुंबईच्या विकासाकरिता विशेष कार्यक्रम (००) (३७) मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी अतिरिक्त केंद्रीय सहाय्य (२२१७ १२४१), ३१ सहाय्यक अनुदाने, - वेतनेत्तर" या लेखाशिर्षाखाली खर्ची घालून सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यात यावा.

०३. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.१ मध्ये नमूद करण्यात आलेली रक्कम मा. महालेखापाल् यांच्याकडील ८६५८-११०-सीएओआरबी सस्पेन्स या लेखाशिर्षामधून उपरोक्त खर्चाच्या लेखाशिर्षाखाली समायोजन करण्याची कार्यवाही करण्यात यावी. उपरोक्त लेखाशीर्ष उपयोगात आणण्यासाठी नगर विकास विभागाचे कक्ष अधिकारी, नवि-५, यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच उपसचिव नवि-५ यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतच्या खर्चामेळाची कार्यवाही नवि-३१ कार्यासनाने करावी.

०४. मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-IIA (MUTP-IIA LOAN NO. IBRD ७९४१ IN)) यासाठी प्राप्त होणा-या कर्ज सहाय्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्वतंत्र लेखे ठेवावेत व सदर प्रकल्पाच्या करारानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने संबंधित कार्यान्वयिन संस्थांना रोख व समायोजन स्वरुपात वितरीत झालेल्या निधीचे संनियंत्रण करावे.

०५. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं.२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ मधील परिच्छेद क्र. ७ मधील अटींची व त्यासोबतच्या परिशिष्टातील नमूद केलेल्या बाबींच्या तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची पूर्तता होत आहे.

०६. सदरचा निधी वितरण आदेश वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९ व वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दिनांक ०८ मार्च,२०१९ मधील नमूद तरतूदीनुसार तसेच सदर प्रस्तावास वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१०२/१९/व्यय-३ , दि.३०.०३.२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार वितरीत करण्यात येत आहे.

०७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०३३०१०२९०५१०२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vishnu Shripati Patil

Digitally signed by Vishnu Shripati Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21ebe4508a75a767041512feeaa6b8f2d5bc8caf857fe02cd29ce4bbb772da09, serialNumber=f8a0fc598f692587efafe9bd62df9e449fdf81c803c27adf1782c97c76ebcba5, cn=Vishnu Shripati Patil
Date: 2019.04.04 15:34:57 +05'30'

(विष्णू पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
३. महानगर आयुक्त,मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे (पूर्व),मुंबई-५१
४. महालेखापाल- (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
५. निवासी अधिदान व लेखा अधिकारी, (लेखा परीक्षा), मुंबई.
६. सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई ३२ .
७. अधिदान व लेखाधिकारी मुंबई
८. वित्त विभाग (व्यय-३), अर्थसंकल्प-१५, अर्थसंकल्प-३.
९. वित्त विभाग (साधन संपत्ती/अर्थोपाय).
१०. नियोजन विभाग (कार्यासन १४७४) (कार्यासन १२११).
११. कक्ष अधिकारी नवि-४, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ .
१२. रोख शाखा (५ प्रती),
१३. निवड नस्ती, नवि-७.